

कॉन्टिनेन्टल प्रकाशनतर्फे आयोजित कार्यक्रमात (डावीकडून) मंजिरी धामणकर, विवेक सावंत, अंबरीश मिश्र, देवयानी अभ्यंकर, सुप्रिया लिमये.

# नजाकत हेच उर्दू भाषेचे सौंदर्य : सावंत

**पुणे** : उर्दू भाषेतून अतिशय साधेपणाने सुंदर भाव व्यक्त करण्याची पद्धत आहे. या भाषेची नजाकत आणि नाजूकता खरोखरीच भावण्यासारखी असते. शब्दांच्याही पलीकडचा अर्थ सांगण्याची ताकद या भाषेमध्ये असल्याने, व्यक्त होताना, आपल्या मनात भावनांच्या अनेक छटा निर्माण होतात. त्यामुळे हेच खरे त्या भाषेचे सौंदर्य आहे, अशा भावना महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी व्यक्त केल्या.

छापील पुस्तके आणि ई-पुस्तके हातात हात घालून पुढे जात असून, ही दोन्ही माध्यमे एकमेकांना समृद्ध करण्याचे काम करत आहेत. त्यामुळे छापील पुस्तके भविष्यात निर्माण होणार नाहीत असे म्हणणे योग्य ठरणार नाही, असेही सावंत म्हणाले.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनतर्फे मंजिरी धामणकर यांनी लिहिलेल्या 'आश्ना : उर्दू शायरीची मराठी सखी' या पुस्तकाचे आणि बुकगंगातर्फे ई-बुक प्रकाशन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमात आश्नाच्या ब्रेल रूपांतरित पुस्तकाचे प्रकाशन निवांत अंध विकासालयातील विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कॉन्टिनेन्टल प्रकाशनच्या संचालिका देवयानी कुलकर्णी व बुकगंगाच्या सुप्रिया लिमये उपस्थित होत्या. या वेळी मंजिरी धामणकर, मंजिरी जोशी व अनुराधा मराठे यांनी लोकप्रिय गीत गजलांचा कार्यक्रम सादर केला. (प्रतिनिधी)